प्रति,
मा. आनंद देशपांडे
महाराष्ट्र फाऊंडेशन
पुणे.

नमस्कार भाऊ,

ग्रामीण विकास केंद्र या संस्थेमार्फत लोककलावंत, अनाथ, निराधार व वंचित घटकातील मुलांच्या शिक्षणासाठी संस्थेने सुरू केलेल्या निवारा बालगृहास आपण केलेल्या आर्थिक मदतीचा फायदा या मुलांच्या शिक्षणासाठी निश्चित झालेला दिसून येत आहे. मुलांना फुल टाईम शिक्षक भेटल्यामुळे त्यांची शैक्षणिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत झाली आहे. मुलांच्या दिवाळीच्या सुट्या संपल्या असून मुले पुन्हा बालगृहात आले आहेत. संस्थेचे कामकाज आपण ठरवल्याप्रमाणे सुरळीत चालू आहे. आपली पुणे येथे भेट झाली होती त्या वेळी तुम्ही नाताळाच्या सुट्टीत संस्थेला भेट देण्याचे ठरवले आहे परंतु त्या भेटीनंतर आपले काहीही बोलणे झालेले नाही. तरी आपण महाराष्ट्रात आल्यावर संस्थेच्या कामास भेट द्यावी व आम्हाला मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

कळावे
आपला विश्वासू

ॲड.डाॅ.अरूण जाधव
(संस्थापक ग्रामीण विकास केंद्र )

GRAMIN VIKAS KENDRA
Jamkhed, Tal.Jamkhed, Dist Ahmednagar,
Maharashtra 413 201, India,
Phone:- (+91) 02421-222266  Mob: (+91) 9422226066.
Email: gvkjamkhed@gmail.com,
Website:- www.gvkjamkhed. org



